अशी नितिन कुलकर्णींची
या कोलाहलासकट एखाद्या
काटेच्या कवितेवर दाटते.
च्या व्यापात हरवून गेलेल्या
छोट्या छोट्या गोष्टी तिला
ांच विकसित झालेलं रुप
अनिता कोकाटेची कविता
ी स्वतःसोबत आपल्यालाही
ा गहिवरुन टाकतं. आणि
ग्गही तिच्यासोबत समजून
ा नमवण्याकरिता मानसिक
वेण्याच्या नवोदित प्रवृत्तीवर
तात. त्यातलं हास्यास्पद
ांडतात. जगण्याच्या या
पण तितकच विद्रूप करुन
याला तितक्याच प्रखरतेने
ात्मक प्रतिबिंब दाखवणारा
व खांडेकर आपल्यासमोर
नाहीतरनही, प्रतिबिंबातलं
विश्वास किंचित गमावून
ाक हातांनी साकारलेलं हे
ं महानगरी मराठी कवितेचं
केलेलं आहे.


**ता-आणि मी!**

ा. भानावर आलो आणि
ारलो. विनाकारण अंगावर
ली. कणा स्टार्च केल्यागत
य आतून बाहेरुन धुवून
ाकलं. कोलाहलात पुन्हा
ी...



April/May/June 2010

# नव्वदोत्तरी कविता : दिशा आणि भवितव्य



वै जं य ती मा ला
जा ध व

१.

१९९० नंतरची कविता ही आशय, विषय आणि रचनातंत्राच्या संदर्भात पूर्वसुरींच्या कवितेपेक्षा वेगळे वळण घेताना दिसते. या कालखंडात लिहिते झालेल्या कवींची कविता ही प्रत्येक काळाला नवा आणि व्यापक अर्थ देऊ पाहते. नव्वदोत्तरी कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवींना भौगोलिक प्रदेश हाही अत्यंत वेगवेगळा असलेला दिसतो. हे वेगवेगळ्या नियतकालिकातून काव्यलेखन करणाऱ्या कवींच्या कवितेवरून लक्षात येते. शब्दवेध, अभिधानंतर, दर्शन, आणि खेळ या आणि अशा स्वरूपाच्या नियतकालिकांतून काव्यलेखन करणाऱ्या कवींच्या कवितेमधील जाणिवांची चर्चा अतिशय विस्तृतपणे या ठिकाणी झाली आहे. यातील काही कवींच्या कविता संग्रहारूपाने प्रसिद्ध

झालेल्या दिसतात.

प्रत्येक कवी त्याच्या लेखानातून त्याच्या अंतर्विश्वातील आणि बाह्यविश्वातील जाणिवांचा शोध घेत असतो. त्याचप्रमाणे कवितेमधून जगण्यातील गुंत्याला उत्तर शोधण्याची त्याची धडपड अखंड चालू असते. ९० च्या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवींची ही धडपड त्यांच्या कवितेतून स्पष्टपणे अधोरेखित करता येते. जागतिकीकरण, माहिती तंत्रज्ञानाचे युग, माध्यम क्रांती या पार्श्वभूमीवर ९० नंतरची कविता उदयाला आलेली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीने मोठ्या प्रमाणात प्रगती केली परंतु त्यामुळे जो विसंवाद निर्माण झाला त्याला ही कविता पृष्ठस्तरावर आणते. संवाद साधण्याची माध्यमे उपलब्ध असताना विसंवादाचे सूर नेमके कुठे निर्माण झाले आहेत हे ९० नंतरच्या कवितेमधून दाखवता येते. जगण्याचे हे नेमके पेच पकडणारी ही कविता वाचकाला अंतमुर्ख होऊन विचार करायला भाग पाडते. एकाच वेळी भिन्न अशा महानगरीय सांस्कृतिक अवकाशात जगताना होणारी कसरतही ९० नंतरच्या कवितेतून स्पष्टपणे दिसते. संजीव खांडेकर, मन्या जोशी, हेमंत दिवटे, सचिन केतकर यासारखे महानगरीय जाणिवांच्या पार्श्वभूमीवर काव्यलेखन करणाऱ्या कवींमध्ये ही कसरत दिसते. पण तरीही त्यांचे एकमेकांपासून असलेले वेगळेपण लक्षात घेण्यासारखे आहे.

*काळ सुटतो*
*भोकांची भगदाड*
*मल्टिफ्रेनिक डिस्कोदांडिया*
*मी झिंगतोय* (मन्या जोशी, ज्याम मज्या, पृ. ६१)

- सभोवतालचा अवकाश वेगवेगळ्या घटकांनी भरलेला आहे. आणि तो एकसंध नसून खंडित आहे. याची जाणीव मन्या जोशीच्या कवितेत दिसते. या अवकाशाला ते 'मल्टिफेनिक' असे संबोधतात. तर 'घाणेरड्या चित्रांनी भरलेल्या करप्ट फ्लॉपीसारखा करप्ट झालेला आत्मा' केतकरांच्या कवितेत जीवनातील हतबलता व्यक्त करतो, तर रोजच्या जगण्यामध्ये संपर्कासाठी मोबाईलसारख्या यंत्राचा होणारा वापर आणि त्यातून जगण्याची होणारी हेळसांड सलील वाघच्या कवितेत येते.

महानगरीय जीवन माणसाला जे वस्तुरूप प्रदान करु पाहते त्याची खोल जाणीव हेमंत दिवटेंची कविता व्यक्त करू पाहत आहे. एखाद्या मेगामॉल मध्ये शॉपिंग करताना तिथली प्रत्येक वस्तू स्वत:च असल्याचा निवेदकाचा आभास म्हणजेच स्वत:च वस्तूप्रमाणे उपभोगले जाण्याच्या भीतीचे प्रकटीकरण आहेच. शिवाय या सगळ्या जगण्याच्या धडपडीत सगळेच एक जीवघेण्या आकांताने धावत आहेत. हा जगण्याच्या धडपडीचा आकांत प्रत्येक काळामध्ये ऐकू येईलच असे वाटते. शेजारच्या फ्लॅटमध्ये राहणारा डिसोजा, त्याच्या घरी होणारी आदळआपट आणि त्याचे कारण विचारण्यासाठी कवीकडे डिसोझाचा नसलेला मेल आयडी हे महानगरातील व्यक्तीच्या जगण्याचे प्रातिनिधिक चित्र आहे. पण तो या सर्व गोष्टी जाणून घेण्याची उत्सुकता, त्याचे अस्वस्थ होणे लपवू शकत नाही.

नव्वदीच्या कालखंडात निर्माण झालेली कविता ही महानगर आणि महानगरीय परिघाबाहेरही स्वत:ला व्यक्त करू पाहते आहे. या कवींमध्ये महानगरीय परिघातील हेमंत दिवटे, सचिन केतकर, सलील वाघ, मन्या जोशी, संजीव खांडेकर, वर्जेश सोलंकी, मंगेश नारायणराव काळे हे कवी आणि महानगरीय परिघाबाहेरील श्रीकांत देशमुख, संतोष पवार, प्रवीण बांदेकर, दासू वैद्य, वीरधवल परब, अजय कांडर, प्रकाश किनगावकर, अजीम नवाज राही, अविनाश साळापुरीकर इ. कवी काव्यलेखन करत असलेले दिसतात.

कार्पोरेट वर्ल्ड, विज्ञान तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या सुखसोयी, कार्पोरेट संस्कृतीने आध्यात्मिकतेचे केलेले व्यावसायिकरण याचे ध्वनी संजीव खांडेकर यांच्या कवितेत स्पष्टपणे उमटलेले दिसतात. हे कवी स्वत:च्या आणि सभोवतालच्या बांधणीतील प्रत्येक घटकाला कवितेत स्थान देऊ पाहत आहेत. "काफ्काच्या भाषेत सांगायचं झालं तर लेखन म्हणजे आपल्या आत घट्ट झालेला बर्फ फोडण्याची कुऱ्हाड आहे. स्वत:ला वितळवायचे साधन आहे. समकालीन कलेसमोर समकालाला वितळवून एका नव्या कास्टमध्ये शिल्पित करण्याचे आव्हान असते. वर्तमानाची गचांडी पकडून त्याला भविष्याची पिल्ले दाखवण्याची जबाबदारी समकालीनांवर असते."[१] या समकालीन कवितेने तिला व्यक्त करण्यासाठी जी भाषिक रचना अवलंबिलेली आहे तीही या कवितेच्या नव्या दिशा दाखवणारी आहे. माहिती तंत्रज्ञानाचे क्षेत्र, विज्ञानाचे क्षेत्र यामध्ये वापरली जाणारी भाषा, बोलीभाषा, नव्या शब्दांची घडण करून केली जाणारी अभिव्यक्ती ही भाषेच्या वेगवेगळ्या शक्यतांचा विस्तार करणारी आहे. "कवितेच्या रचनेमध्येच भाषेच्या विरचनेच्या (Deconstruction) किमया ही कविता करू लागली. आणि त्यामुळे कविता मधून पोचणयाच्या एका ठिकाणाकडे न नेता सातत्याने मागेपुढे नेणाऱ्या भटकंतीचे दर्शन घडवते. त्यामुळे कवितेला आदी-अंत राहिला नाही"[२] एका विशिष्ट पध्दतीनेच काव्यभाषेचा वापर न करता, परंतु गद्यात्मकताही टाळत या कवितेने स्वत:ची काव्यभाषा निर्माण

...ांताने धावत आहेत.
...त्येक काळामध्ये ऐकू
...मध्ये राहणारा डिसोजा,
...ट आणि त्याचे कारण
...वा नसलेला मेल आयडी
...ाचे प्रातिनिधिक चित्र आहे.
...घेण्याची उत्सुकता, त्याचे
...।
...नेर्माण झालेली कविता ही
...ाघाबाहेरही स्वत:ला व्यक्त
...हानगरीय परिघातील हेमंत
...वाघ, मन्या जोशी, संजीव
... नारायणराव काळे हे कवी
... श्रीकांत देशमुख, संतोष
..., वीरधवल परब, अजय
...ोम नवाज राही, अविनाश
... करत असलेले दिसतात.
...तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या
...आ...त्मिकतेचे केलेले
... खांडेकर यांच्या कवितेत
... कवी स्वत:च्या आणि
... घटकाला कवितेत स्थान
... भाषेत सांगायचं झालं तर
... झालेला बर्फ फोडण्याची
...वे साधन आहे. समकालीन
... एका नव्या कास्टमध्ये
... वर्तमानाची गचांडी पकडून
...ी जबाबदारी समकालीनावर
... तिला व्यक्त करण्यासाठी
... आहे तीही या कवितेच्या
...ी तंत्रज्ञानाचे क्षेत्र, विज्ञानाचे
... बोलीभाषा, नव्या शब्दांची
...ती ही भाषेच्या वेगवेगळ्या
... "कवितेच्या रचनेमध्येच
...ction) किमया ही कविता
...विता ...ून पोचवण्याच्या
... मागेपुढे नेणाऱ्या भटकंतीचे
...ादी-अंत राहिला नाही"[२]
...चा वापर न करता, परंतु
...वत:ची काव्यभाषा निर्माण



केलेली दिसते.

उदा. स्पायडरलो, कल्चरलेली फ्यूजन सीडी (ऑल दॅट आय् वान्ना डू, सर्ज इंजिन) किंवा डिस्टॅट दक्षता (मन्या जोशी, ज्याम मज्या) या सारख्या नव्याने केलेल्या शब्दांची घडण ठिकठिकाणी दाखवता येते.

• जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आधुनिकीकरणाची अवस्था दाखवण्याचे काम ही कविता आपल्या भाषेतूनही करत आहे. पर्यायाने भाषासंमिश्रणाच्या खुणा या कवींच्या कवितेतून दाखवता येतात. नव्वदीच्या दशकातील जागतिकीरणाने निर्माण झालेले पेचप्रसंग त्याचे पडसाद या कालखंडातील कविता अधोरेखित करते. संतोष पदमाकर पवार यांच्या 'भ्रमिष्टाचा जाहिरनामा' ही दीर्घ कविता या युगाचे त्यामधील मोडतोडीचे प्रकटीकरण करते. १९९० नंतरची ही कविता वेगवेगळ्या दिशांनी विकसित झालेली दिसते. महानगरे, महाराष्ट्रातील नागर, अर्धनागरी भाग, ग्रामीण भागातील या वेगवेगळ्या प्रदेशातून ती पुढे येताना दिसते. त्यामधून व्यक्त होणारी जाणीवही अशाच पद्धतीने वेगवेगळी आहे.

तर महानगरीय परिघाबाहेरील लेखन करणाऱ्या वीरधवल परब सारख्या कवीची कविता या ग्लोबल जगण्यामध्ये स्वत:च्या संवेदना, स्वत:ची नीती-मूल्ये विसर्जित होत आहेत. याविषयीची अस्वस्थता व्यक्त करताना दिसते. उदा.

*बांडगुळासारखे जगत राहिलो*
*गावात असून नसल्यासारखा*

अनागरी आधुनिक जगण्यातले वेगवेगळे पेचप्रसंग वीरधवल परब यांची कविता मांडते, वीरधवल परब, संतोष पवार, श्रीकांत देशमुख, अजिम नवाज राही यासांरख्या कवींची कविता जागतिकीकरणाने आलेल्या बदलाना सामोरी जात अत्यंत सशक्तपणे नवे कालभान व्यक्त करताना दिसते. स्वत:चा असा वेगळा कालस्वर ती मांडते.

कविता या स्वत:च्या निखळ आनंदासाठी, स्वत:च्या अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन म्हणून गृहित धरल्यावर त्या सद्यस्थितीमध्ये आणि त्यानंतरही अशा स्वरूपाने वाचकासमोर येणे अटळ आहे. केशवसुतांच्या कवितेपासून आधुनिक मराठी कवितेचे युग, मर्ढेकरांच्या कवितेपासून नवकवितेचे युग चालू झाले असे आपण म्हणतो, त्याचप्रमाणे नव्वदोत्तरी कवितेने जागतिकीकरणाचे, विज्ञान-तंत्रज्ञानाचे, माणसाच्या जगण्यातील गुंत्याचे अनेक पडसाद व्यक्त केले. नव्वदच्या दशकामध्ये लिहणाऱ्या काव्यलेखनाने या कालखंडातील कविता समृध्द झाली. पण यामध्ये केशवसुत, मर्ढेकर याप्रमाणे एकच एक कवी केंद्र म्हणून अधोरेखित करता येत नाही. या काळातील काव्यलेखन करणाऱ्या सर्वच कवींची कविता ही ९० च्या कवितेचे युग घडवताना दिसते. कारण वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशात काव्यलेखन करणाऱ्या या कवीच्या कवितेतील अनुभवद्रव्य आणि आशय हा पुरेसा सकस असल्याचे दिसते. जागतिकीकरण आणि नवनवीन तंत्रज्ञानाच्या सान्निध्यात जगणारा समूह एकाच वेळी एकसारख्या अनुभविश्वात जगत होता. मात्र या समान अनुभविश्वात जगत असताना याला प्रत्येकाने दिलेली प्रतिक्रिया, त्याची विचार करण्याची वेगळी पध्दती यामुळे या एकाच कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवींच्या कवितेमध्ये वेगळेपण जाणवते.

"वाचक कवीचं अनुकरण करतो तशी त्याला कवीची कृती उलगडते. जगातल्या प्रत्येक संभाव्य व्यक्तीच्या ठिकाणी आपण असू शकतो, हे कल्पण्याची क्षमता आपल्यात आहे म्हणूनच आपण एकूण साहित्याला प्रतिसाद देऊ शकतो. आणि कवितेत एकट्या कवीचंच उत्कट आत्मभान आपल्याला स्वीकारावं लागत असल्यानं ज्याला जास्तीत जास्त तीव्र उलटसुलट प्रतिक्रिया होतात तो वाङ्मय प्रकार कविता हाच आहे"[३]

अशा स्वरूपाने या काव्यव्यवहाराला उलटसुलट प्रतिक्रिया कवीची कृती उलगडत वाचकही या काव्यव्यवहारातील महत्त्वाचा बिंदू म्हणून गणला जाईल. आणि सभोवतालच्या भाषिक आणि सांस्कृतिक परिस्थितीत कवी त्याची काव्यनिर्मिती अपरिहार्यपणे करत राहील असे वाटते.

"एक आत्मसंरक्षणाची गरज कलेमध्ये जपणं आवश्यक आहे. हे टिकण्यासाठीची लढाई आहे. आणि कलेत तिचा स्वर जपणं गरजेचं आहे. हे आत्मसंरक्षणाचं सूत्र, हा विचार परत कुठंतरी रूजावा असं मला वाटतं. तो रूजला की एका पिढीला सबंध नवी दिशा मिळू शकते. प्रत्येकजण आपापल्या पद्धतीनं लिहिणार, पण त्याच्या लिहिण्याची कसोटी त्याच्या तारकत्वावर किंवा मारकत्त्वावर लागेल. काफ्कासारखा मनुष्य सुध्दा आपल्याला जगवतो कारण की जे विश्व तो पाहाते, तो बाकीच्या सगळ्यांना पडलेल्या स्व्प्नांवरचा उत्तारा असतो" ही दिलीप चित्रेंनी केलेली नोंद महत्त्वाची आहे. कवी त्याच्या स्वत:चा स्वर कलेमधून जोपासतो. त्यासाठी तो भाषेचा आश्रय घेतो ही भाषा त्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक घडीचा आविष्कार असते.

यासंदर्भात याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणानुसार ९० टक्के बोलीभाषा

ह्या अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहेत. या वेगवेगळ्या बोलीभाषांचा, त्यातील बहुविध शब्दसंपदेचा स्रोत टिकवून ठेवण्याचे एक महत्त्वाचे काम या अनुषंगाने भविष्यामध्ये या कवींना करावे लागणार आहे.

२.

प्रामुख्याने विविध सूत्रांच्या आधारे ९० नंतरच्या कवितांची दिशा आणि भवितव्य याविषयी मांडणी करता येईल. प्रस्तुत निबंधातील या विभागात या कवींचा कवितेविषयीचा काव्यव्यापार आणि काव्यविषयक भूमिका या एकाच सूत्राचा विचार केला आहे. १९९० नंतर काव्यलेखन करणारे कवी कविता व्यवहाराबद्दल कोणत्या स्वरूपाची भूमिका घेतात आणि त्यांच्या कवितेत याचे प्रतिध्वनी कसे उमटतात याचा येथे आढावा घेत आहे. १९६० च्या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या दिलीप चित्रे, वसंत आबाजी डहाके, विलास सारंग इ. कवींनी कविता व्यापारावर केलेल्या कविता आणि कवितेसंबंधी निश्चित केलेल्या भूमिका आपल्याला ज्ञात आहेतच. याठिकाणी प्रातिनिधिक स्वरूपात चित्रे, डहाके, सारंग यांनी कविता व्यापारावर केलेले भाष्य आणि अशा स्वरूपाचीच ९० नंतरच्या कवींची भूमिका लक्षात घेता येईल. जेणेकरून ९० नंतरच्या कवितेच्या दिशा येथे स्पष्ट करता येतील.

नव्वदोत्तरी कवितेला जवळचा असा पूर्वसुरींच्या कवितेचा संदर्भ म्हणून साठोत्तर कालखंडातील काव्यलेखन करणाऱ्या कवींच्या कवितेचा आणि त्यांनी निश्चित केलेल्या काव्यविषयक भूमिकांचा परामर्श याठिकाणी घेतला आहे. (वसंत आबाजी डहाके यांनी 'कविता म्हणजे नेमके काय असतं?' या लेखात त्यांची कवितेविषयीची भूमिका विस्तृतपणे मांडली आहे.) नवे अर्थबंध निर्माण करणारी, लय निर्माण करणारी भाषा कवितेला घडवते असे डहाके म्हणतात. शिवाय चांगल्या कवितेचे निकष जवळ असल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे अवघड असते. अशी भूमिका ते घेतात. डहाकेंची ही कवितेविषयाची भूमिका त्यांच्या कवितांमधूनही कळत नकळतपणे येताना दिसते. '(चित्रलिपी'मध्ये त्यांच्या कवितेतील लयबद्धता, नादमाधुर्य त्यांच्या या भूमिकेला अधोरेखित करते.) कवितेमधील फॉर्म ला महत्त्व असून फॉर्म हाच तिचा मूलभूत घटक आहे असे सारंग नोंदवतात. तर चित्रेंच्या मते कविता भाषेद्वारा गोचर होणारी अंतर्विश्वातील घटना असते. कवी सहसा कथन करत नाही तर ते सतत तातडीचे शब्द वापरतात आणि त्या शब्दातील अनुभव तिथल्या तिथेचं उलगडून संपूर्ण होत असतो. म्हणून आपल्याला गुंतवून टाकणाऱ्या कवितेत आपण पुन्हा पुन्हा गुंततो. त्या कवितेत जे घडतं ते त्या त्या शब्दांच्या वा आपल्याला येणाऱ्या अनुभवामुळे घडतं, चित्रेंच्या या भूमिकेमध्ये त्यांनी 'वाचक' घटकात केंद्र बनलेला दिसतो. किंबहुना कवितेच्या घडणीत वाचक हा अविभाज्य घटक असते असे इथे गृहित धरलेले दिसते. साठनंतरच्या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवी समीक्षकांनी कवितेचा हा व्यापार मुळापासून उलगडून दाखवण्याचे महत्त्वाचे कार्य केलेले दिसते. सभोवतालचे विश्व आणि कवी यांच्यामध्ये माध्यम म्हणून कविता काम करते.

नव्वदनंतरच्या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवींनी कवितेविषयी, कवितेच्या एकूणच व्यवहाराविषयी निश्चित केलेल्या भूमिका या उपरोक्त भूमिकांच्या जवळ जातात. पण त्यांची अभिव्यक्तीची पध्दत मात्र भिन्न आहे. कवी होण्यासाठी स्वत:मध्ये असलेली जुनी सॉफ्टवेअर्स अनइन्स्टॉल करणे महत्त्वाचे असते आणि नव्यानं काही इन्स्टॉल करावं लागतं. नव्या गोष्टींचा ध्यास, कवितेतून काहीतरी नवं करणं, नव्यानं माडणं म्हणजेच कविता होय, असे हेमंत दिवटेंना वाटतं.

तर केतकरांना कवितेमध्ये स्वत:ची भाषा, स्वत:चे चिंतन व अभ्यास आला तर ती अधिक महत्त्वाची वाटते. नव्या भाषेची, नव्या विचारधारेची अभिव्यक्ती म्हणून कवितेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन आहे. यावरून कवितेमधील वैचारिकतेचा घटकही महत्त्वाचा असल्याचे ९० नंतरच्या कवितेमधून जाणवते, ते स्वागतार्ह आहे. शिवाय संगणक, मोबाईल, इंटरनेट या गोष्टींचा उल्लेख म्हणजे नवीन कविता नव्हे. कारण तिच्यामध्ये व्यापक संदर्भात विचार करण्याची क्षमता नसते अशी भूमिका केतकर घेतात. समकालीनता म्हणजे नुसती सद्यस्थितीची जाणीव नसून काळाच्या वेगाची जाणीव असते. समकालीन कवी, त्यांची कविता या जाणिवेचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे ती अधिक सशक्त आणि सकस बनते. ९० नंतरच्या कालखंडात लिहिल्या गेलेल्या कवितेमध्ये ही काळाची जाणीव अधिक तीव्र होत गेलेली आहे. सभोवतालची प्रचंड गर्दी, कोलाहल, अशांतता यांना भेदण्यासाठी कवितेशिवाय पर्याय नाही अशी भूमिका हिमांशू स्मार्त यांनी घेतली आहे. अशाच स्वरूपाने मंगेश नारायणराव काळेही कवितेतील शब्दांच्या कोलाहालाबद्दल आपली भूमिका मांडतात. त्यांनी आपल्या कवितेतून परंपरेतील शब्दांचा सशक्तपणे वापर केलेला दिसतो (निरुपण, जिव्हाग्र, कराग्र इ.) कवी समकालातील आणि परंपरेतील शब्दांच्या वापरातून

ाऱ्या कवितेत
डतं ते त्या त्या
ळे घडतं, चित्रेंच्या
द्र बनलेला दिसतो.
ा अविभाज्य घटक
ठनंतरच्या कालखंडात
ी कवितेचा हा व्यापार
हत्त्वाचे कार्य केलेले
त्री यांच्यामध्ये माध्यम

काव्यलेखन करणाऱ्या
कूणच व्यवहाराविषयी
नकांच्या जवळ जातात.
ात्र भिन्न आहे. कवी
ॉफ्टवेअर्स अनइन्स्टॉल
काही इन्स्टॉल करावं
र काहीतरी नवं करणं,
, असे हेमंत दिवटेंना

तःची भाषा, स्वतःचे
धक महत्त्वाची वाटते.
यक्ती म्हणून कवितेकडे
यावरून कवितेमधील
ल्याचे ९० नंतरच्या
ाहे. शिवाय संगणक,
म्हणजे नवीन कविता
र्गत विचार करण्याची
घेतात. समकालीनता
सून काळाच्या वेगाची
ी कविता या जाणिवेचे
सशक्त आणि सकस
या गेलेल्या कवितेमध्ये
होत गेलेली अड़े.
ल, अशांतता यांना
अशी भूमिका हिमांशू
ाने नारायणराव
बद्दल आपली भूमिका
परंपरेतील शब्दांचा
पण, जिव्हाग्र, कराग्रं
ल शब्दांच्या वापरातून



स्वतःचे भाषेला शरण न जाणे अधोरेखित करत आहे.

एकूणच ९० नंतरच्या कवींनी त्यांच्या कवितेमधून आणि कवितेविषयीच्या भूमिकांमधून काव्यव्यवहाराबद्दल घेतलेल्या भूमिका या परस्परपूरक अशा आहेत. एकाच वेळी कवी म्हणून काव्यव्यापाराची आणि त्यासंबंधाने स्वतःची अशी भूमिका मांडणे या उत्सुकतेपोटी याठिकाणी कवितेविषयीचा विस्तृतपणे विचार केला आहे. ९० नंतरच्या कवितेच्या दिशा कोणकोणत्या अंगानी विकसन पावल्या यांचा प्रायोगिक पातळीवर याठिकाणी वेध घेण्याचा मानस होता. तो प्रत्यक्षपणे त्यांच्या कविता आणि त्यांच्या भूमिका समोरासमोर ठेवून घेतला आहे. मात्र यामध्ये ९० नंतरच्या कवितेतील सर्वच सूत्रे केंद्रस्थानी न ठेवता ९० नंतरच्या कविता, काव्यव्यापार व कवितेविषयींची भूमिका हे एकच सूत्र विचारात घेतले होते. विविध पटावर विविध सूत्रांआधारे काव्यलेखन करणाऱ्या या सर्व कवींच्या कवितांना वरील सूत्राने एकत्र बांधणे शक्य होते असे लक्षात आले. महानगरीय परिघाबाहेरची कविता, अर्धनागर भागातील कविता, ग्रामीण भागातील कविता असे नव्वद नंतरच्या कवितेचे जे विविध विभाग केले गेले आहेत. त्या विभागतील बहुतांश कवी आपली कवितेविषयीची एक भूमिका निश्चित करताना दिसत आहेत. यातील अनेक कवी त्यांना कविता निर्मिती करत असताना येणारे अनुभव, त्यावेळी त्यांची होणारी तगमग मांडतात. तर काही कवी, कवीच्या वाट्याला आलेल्या करंट्या वर्तमानाविषयी, कवितेतून वाहणाऱ्या त्याच्या गढुळल्या जाणिवांच्या तुटक्याफुटक्या करंट्या वर्तमानाविषयी, कवितेतून वाहणाऱ्या त्याच्या गढुळल्या जाणिवांच्या तुटक्याफुटक्या सत्याविषयी लिहिताना दिसतात, कविता लिहून कागदावर मोकळे होण्याचा अनुभव, जगण्याचा कवितेवर होणारा परिणाम, सवत बनून बायकोला छळणाऱ्या कविता, अशा वेगवेगळ्या स्वरूपाने कवितेला सामारे जात असताना कवीची बदलणारी मनोवस्था नव्वद नतंरच्या कवितेमध्ये येते.

एकूण नव्वद नंतरची कविताही कविताव्यापाराचे हे सामूहिक वैशिष्ट्य टिकवून आपली वाटचाल यशस्वीपणे करत आहे आणि भाषेसारख्या लवचिक ज्ञानसाधनेद्वारे कवितानिर्मितीची ही प्रक्रिया भविष्यामध्ये अखंड चालू राहिलं असे वाटते. नव्वद च्या दशकामध्ये काव्यलेखन करणाऱ्या कवींची कविता ही समकालीन व्यवस्थेचे दर्शन तर घडवतेच, पण भविष्यामध्येही सामाजिक आणि सांस्कृतिक अभिसरण निकोप होण्याच्या दृष्टीने कवीने स्वतःचा अवकाश निर्माण करून त्या अवकाशात कवितानिर्मिती करत राहणे गरजेचे असते. त्यादृष्टीने भविष्यामध्ये कवी त्याच्या वेगवेगळ्या अस्तित्व अवस्थामध्ये काव्यनिर्मिती करत राहतील. □

बदलत्या समकालीन राजकारण, समाजकारणाचा
वेध घेणारी प्रवीण दशरथ बांदेकर यांची कादंबरी



मूल्य : ३२५ रुपये, पृष्ठे : ३५०
संपर्क :
शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
वॉर्ड नं ७, श्रीरामपूर - ४१३ ७०९ (मोबा. ९८२२२१५०९९